# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

**गुरुवार, दिनांक १ डिसेंबर, २०२२ /अग्रहायण १०, १९४४ (शके)**

### १४४. लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते कि, सन २०२१ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन मंगळवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी संस्थगित झाले. संस्थगित झालेल्या सन २०२१ च्या तृतीय अधिवेशनातील एकूण ३७ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र मंगळवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. उक्त जोडपत्रामधील १० लक्षवेधी सूचनांची निवेदने विभागाकडून प्राप्त झाली असून त्याचदिवशी मा.सदस्यांकरीता राखून ठेवण्यात आलेल्या टपालखणाद्वारे वितरीत करण्यात आली होती. उर्वरित २७ स्वीकृत लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १५ निवेदने दिनांक १७ जानेवारी, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक २ अन्वये सन्मा.सदस्यांना वितरीत करण्यात आले होते. तसेच प्रलंबित १२ स्वीकृत लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ६ निवेदने दिनांक २१ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १२ अन्वये वितरीत करण्यात आली होती. आता एकूण ६ प्रलंबित स्वीकृत लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ३ निवेदने दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १२९ अन्वये वितरीत करण्यात आली होती. आता एकूण ३ प्रलंबित स्वीकृत लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १ निवेदन शाखेत प्राप्त झाले असून यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : १ डिसेंबर, २०२२

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानसभा.

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)

<u>लक्षवेधी सूचना क्र.१९</u>

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२१ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

सर्वश्री. सुनिल प्रभू, अतुल बेनके, जितेश अंतापूरकर, नानाभाऊ पटोले, सुरेश वरपुडकर, पृथ्वीराज चव्हाण, अमीन पटेल, विकास ठाकरे, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री. माधवराव पवार, मोहनराव हंबर्डे, कुणाल पाटील, हिरामण खोसकर, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. अमित झनक, सुभाष धोटे, वि.स.स. यांनी विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे :-

"राज्यात वीज वितरण यंत्रणा अद्ययावत करण्यासाठी महावितरणच्या पायाभूत सुविधांच्या विकास कामाकरिता प्रकल्प-२ अंतर्गत सन २०१४-२०१९ या कालावधीत करण्यात आलेल्या ६५०० कोटी रुपायाच्या विकास कामांची तपासणी करण्यासाठी ६ सदसीय चौकशी समिती नेमण्याचा राज्य शासनाने दि.९.११.२०२१ रोजी निर्णय घेण्यात येणे, सदरहू समितीने १ डिसेंबर २०२१ पर्यंत चौकशी अहवाल सादर करण्याचे शासनाने आदेश निर्गमित करणे, सन २००७-१४ या कालावधीत १२ हजार कोटी रुपयांची कामे पायाभूत सुविधा विकास प्रकल्प-१ अंतर्गत झाली असताना सन २०१४-१९ या काळात पायाभूत सुविधा विकास प्रकल्प-२ अंतर्गत ६५०० कोटी रुपयाची तीच कामे सुचविण्यात आल्याने यामध्ये मोठ्या आर्थिक गैरव्यवहार, घोटाळा झाल्याची शक्यता वर्तविण्यात येऊन संशयाचे वातावरण निर्माण होणे, सदरहू प्रकरणी शासनाने प्राप्त चौकशी अहवालानुसार त्वरीत संबंधित प्रकल्पातील दोषींविरुद्ध कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया"

### <u>मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन</u>

महावितरणद्वारा सन २०१४ ते सन २०१९ या कालावधीत राबविण्यात आलेल्या स्वनिधी, जिल्हा विकास समिती, राज्य, केंद्र, वा इतर स्त्रोतांतील सहाय्याने राबविलेल्या पायाभूत प्रकल्पातील विविध मुद्यांवर तपासणी करुन त्यात झालेल्या अधिनियम/नियम/विनियम/MERC SoPs इ. च्या अनुषंगाने झालेल्या अनियमिततेची चौकशी करुन, त्याची कारणे यांची तपासणी करुन, अशा बाबी भविष्यात न होण्याच्या दृष्टीने मान्य योजना राबविताना अवलंबिण्यात आलेली कार्यपद्धती, त्यात बदल आवश्यक असल्यास त्याचा अभ्यास करुन उपाययोजना शिफारशीत करण्यासाठी दि. १५.०३.२०२२ च्या शासन निर्णयान्वये चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने अद्याप शासनास अहवाल सादर केलेला नाही.

*****************************